19 DEC 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गार्डन्स क्लबच्या पुष्प प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद

# पुष्प प्रदर्शनात शिवाजी विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोल्हापूर महानगरपालिका आणि गार्डन्स क्लब कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महावीर उद्यानामध्ये घेण्यात आलेल्या दोन दिवसीय पुष्प प्रदर्शनाचा रविवारी समारोप झाला. यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद शिवाजी विद्यापीठाने पटकावले. या प्रदर्शनाला दोन दिवसांत दहा हजार पुष्पप्रेमींनी भेट दिली.

गार्डन्स क्लबचे हे ५२ वे पुष्पप्रदर्शन होते. या दोन दिवसीय पुष्प प्रदर्शनाला निसर्गप्रेमी आणि रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. गुलाब आणि विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने आणि पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोन्साय, मुक्त रचना, लँडस्केपिंग यासाठी पारितोषिक देण्यात आले.

सकाळी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, फुलबाग, फुले व बुके या विषयावर आधारित स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

या विविध स्पर्धांतील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण राज्य जीएसटीचे संयुक्त आयुक्त सुनीता थोरात यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी आर. एल. तावडे फाउंडेशनच्या अध्यक्षा शोभा तावडे होत्या. या कार्यक्रमात गार्डन्स क्लबचे रोझेट हे नियतकालिक आणि वार्षिक कॅलेंडरचेदेखील प्रकाशन करण्यात आले.



कोल्हापुरात आयोजित पुष्प प्रदर्शनात मिळालेले सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक अभिजित जाधव, शशिकांत साळुंखे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वीकारला.

यावेळी क्लबचे उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, डॉ. अल्पना चौगुले, जयश्री कजारीया, शैला निकम, संगीता कोकितकर, रवींद्र साळुंखे, राज अथणे, आदी उपस्थित होते. वर्षा वायचळ यांनी आभार मानले.

विद्यापीठाने विविध पुष्प स्पर्धांमध्ये विविध ३० गटांत एकूण १७ प्रथम क्रमांक, १४ द्वितीय क्रमांक आणि १८ तृतीय क्रमांक अशा एकूण ४९ पारितोषिकांसह 'सर्वसाधारण विजेतेपद' पटकावले. विद्यापीठाच्या दुरंगी गुलाबास 'क्वीन ऑफ दि शो'चा मान मिळाला आहे. विद्यापीठाच्या उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारली.

पारितोषिकांचा तपशील : क्लास १ : गुलाब (एकच फूल) : १. पांढरा (प्रथम, द्वितीय, तृतीय), २. फिका गुलाब (प्रथम, द्वितीय तृतीय), ३. गडद गुलाब (प्रथम), ४. नारिंगी (प्रथम), ५. किरमिजी (तृतीय), ६. फिका पिवळा (प्रथम, द्वितीय, तृतीय), ७. गडद पिवळा (प्रथम, तृतीय), ८. पट्टे असलेला (प्रथम), ९. दुरंगी (प्रथम (क्वीन ऑफ शो), १०. मिश्र रंग (प्रथम, तृतीय)., क्लास २ : गुलाब (एकाच जातीचे) : १. एकूण ६ फुले (प्रथम, तृतीय), २. एकूण ९ फुले (प्रथम, तृतीय), क्लास ३ : बटण गुलाब (द्वितीय), क्लास ४ : बटण गुच्छ : १. पॉलीएंथा (प्रथम, द्वितीय, तृतीय), क्लास ६ : गुलाब ३ टप्प्यातील (प्रथम), क्लास ७ : फुले : १. डेलिया (द्वितीय), २. ग्लाडीओलस (द्वितीय, तृतीय), ३. झिनिया (द्वितीय, तृतीय), ४. अस्टर (तृतीय), ५. कर्दळ (प्रथम), ६. शेवंती (तृतीय), ७. सालविया (प्रथम, द्वितीय), ८. निशिगंध (द्वितीय), ९. जास्वंद (तृतीय)., क्लास ९ : कुंड्यातील रोपे: १. गुलाब (प्रथम, द्वितीय, तृतीय), २. फर्न (तृतीय), ३. क्रोटोन (प्रथम, द्वितीय), ४. कोलीअस (द्वितीय, तृतीय)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 DEC 2022
लोकमत

# १५ हजार प्राध्यापकांचा परीक्षेवर बहिष्कार

## नेट, सेट, पीएचडीधारकांचा निर्धार : सहायक प्राध्यापकांची भरती करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यातील पंधरा हजार प्राध्यापकांनी परीक्षेच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार नेट, सेट आणि पीएचडीधारकांनी केला असून कोल्हापुरात झालेल्या महाराष्ट्र राज्य नेट, सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीच्या अधिवेशनात हा निर्णय घेण्यात आला. वरिष्ठ महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांची भरती करून विविध मागण्या पूर्ण होईपर्यंत शासनाकडे पाठपुरावा करावा, असा ठरावही या अधिवेशनात समितीने सर्वांनुमते मंजूर करण्यात आला.



कोल्हापुरात विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयात पीएचडीधारकांनी विविध मागण्यांसाठी शिक्षण सहउपसंचालक डॉ. हेमंत कटरे यांच्याकडे निवेदन देण्यात आले. यावेळी पी. टी. माने, डॉ. कांचन जोशी, प्रा. अश्विनी कांबळे, प्रा. स्नेहल चौगुले, प्रा. माधुरी कोळी, किरण पाटील, प्रा. राजेंद्र कोळी, डॉ. प्रमोद तांबे, प्रा. सुरेश देवडे-पाटील उपस्थित होते.

### अधिवेशनातील मुद्दे

- माने समितीचा अहवाल अर्धवट मान्य केला आहे, त्याची संपूर्ण अंमलबजावणी करावी.
- केंद्र व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार १०० टक्के सहायक प्राध्यापक भरती गतिमान करावी.
- वेठबिगारीचा पुरस्कार करणारे तासिका तत्त्व धोरण बंद करून समान काम, समान वेतन मिळावे.
- विनाअनुदानित महाविद्यालयांत कायमस्वरूपी पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची नेमणूक करावी.

गेल्या कित्येक वर्षांपासून राज्यभरातील वरिष्ठ महाविद्यालयांत सहायक प्राध्यापकांची भरती बंद आहे आणि सध्याची भरती संथगतीने सुरू असल्यामुळे नेट, सेट आणि पीएचडी या उच्च पदव्या घेऊन बेरोजगारीत दिवस काढणाऱ्या तरुणांची सहनशीलता संपली आहे. याच्या निषेधार्थ हा निर्णय कोल्हापुरात गेल्या आठवड्यात झालेल्या नेट, सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीच्या विभागीय अधिवेशनात घेण्यात आला. या अधिवेशनात राज्य समन्वयक डॉ. प्रमोद तांबे, प्रा. सुरेश देवडे पाटील आणि डॉ. कांचन जोशी यांच्यासह विभागातील अनेक पात्रताधारक सहभागी झाले होते.

माने समितीच्या सी. एच. बी. अहवालाचा स्वीकार करून शासनाने १७ ऑक्टोबर रोजी काढलेल्या आदेशानुसार सीएचबीधारकांना परीक्षेविषयीची कामे देता येणार नाहीत, या आदेशाचे काटेकोरपणे पालन व्हावे म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंसोबत चर्चा करण्यात आली.

सी.एच.बी.धारकांच्या विविध मागण्यांसाठी तसेच वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पगारातील तफावतीबद्दल कोल्हापूरच्या विभागीय उच्चशिक्षण संचालकांची भेट घेण्यात आली. सी.एच.बी.धारकांना वर्षातून किमान ११ महिने कोणताही दुजाभाव न करता आणि काटछाट न करता पूर्ण पगार द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

लोकमत

न्यूज Inbox

# सिद्धी शिरवडेकरला सुवर्णपदक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय ज्यूदो स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात सिद्धी शिरवडेकर हिने सुवर्णपदकाची कमाई केली. शहाजी कॉलेजची विद्यार्थिनी असलेल्या सिद्धीची शिवाजी विद्यापीठात झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर तिची जालंधर (पंजाब) येथील लवली प्रोफेशनल विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्राचार्य डॉ. आर.के. शानेदिवाण, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. प्रशांत पाटील, प्रशिक्षक संतोष बाबर यांचे मार्गदर्शन लाभले.



पुढारी

# शिवाजी विद्यापीठचा टेबल टेनिस संघ जाहीर

कोल्हापूर : राजीव गांधी प्राद्योगिकी विश्वविद्यालय, भोपाळ येथे होणाऱ्या वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी टेबल टेनिस स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला. स्पर्धा दि. २० ते २४ डिसेंबर याकालावधीत होणार आहेत. टीममध्ये ऋषीकेश नलवडे-कर्णधार, प्रतीक जाधव, वेदांत तांबे, साईनाथ खरे व सुमंतू साळुंखे यांची निवड करण्यात आली. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. आर. एस. पवार यांची निवड झाली.

19 DEC 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरची प्रिया पाटील बनली ब्रँड ॲम्बेसिडर

**कोल्हापूर :** कोरोना काळामध्ये केलेल्या कामाची शासन स्तरावर दखल घेऊन प्रिया पाटील हिची राज्याची राष्ट्रीय सेवा योजनेची सदिच्छादूत म्हणून २०२२-२३ साठी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रियांका पाटील हिने भवानी फाऊंडेशनच्या माध्यमातून कोरोना काळात सुरू असलेल्या शववाहिकेवर चालक म्हणून काम केले होते. यावेळी पाचशेहून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे काम हर्षल सुर्वे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने तिने केले होते. या कामाची व धाडसाची दखल घेत राज्य शासनाने तिची निवड केली आहे.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढलेल्या शासन आदेशात म्हटले आहे की, प्रिया पाटील यांनी केलेले सामाजिक कार्य युवकांना प्रेरणादायी ठरण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विनामानधन तत्त्वावर सदिच्छादूत म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांची या कालावधीमध्ये व्याख्याने आयोजित करणे, विद्यार्थी व युवकांशी संवादाचे कार्यक्रम आयोजित करणे आणि त्या कार्यक्रमांमध्ये शासनाच्या विविध योजना, तसेच विविध उपक्रम राबवण्यासाठी सहकार्य करतील.

19 DEC 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘एक आठवडा, एक प्रयोगशाळा’ देशव्यापी मोहीम राबवणार

## केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांची घोषणा



**नवी दिल्ली :** केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री आणि सीएसआयआरचे (विज्ञान आणि औद्योगिक संशोधन परिषद) उपाध्यक्ष डॉ. जितेंद्र सिंह यांनी ६ जानेवारी २०२३ रोजी सीएसआयआरची ‘एक आठवडा, एक प्रयोगशाळा’ ही देशव्यापी मोहीम सुरू होणार असल्याचे जाहीर केले. याअंतर्गत, देशभरातील सीएसआयआरच्या ३७ प्रमुख प्रयोगशाळा/संस्थांपैकी प्रत्येक प्रयोगशाळा/संस्था दर आठवड्याला एकामागून एक भारताच्या जनतेसमोर आपला आगळा नवोन्मेष आणि तंत्रज्ञानविषयक प्रगती प्रदर्शित करतील.

नवी दिल्ली येथील विज्ञान केंद्रात सीएसआयआरच्या २०० व्या नियामक मंडळाच्या बैठकीला संबोधित करताना मंत्री डॉ. सिंह म्हणाले, ‘एक आठवडा, एक प्रयोगशाळा’ या संकल्पनेवर आधारित मोहीम सखोल तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांच्या माध्यमातून नव्या संधी शोधण्यासाठी युवा नवोन्मेषी, विद्यार्थी, स्टार्टअप्स, शिक्षण क्षेत्रामधील अभ्यासक आणि उद्योगांच्या विचारांना चालना देईल. आजच्या बैठकीत डॉ. जितेंद्र सिंग यांनी महिला शास्त्रज्ञांसाठी संशोधन अनुदान प्रस्तावाच्या विशेष निर्णयाची घोषणा केली. संशोधन अनुदान प्रस्तावाचा निर्णय अशा महिला शास्त्रज्ञांसाठी आहे, ज्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये ब्रेक (काही काळासाठी रजा) घेतला आहे आणि संशोधनात परत येऊन आपली कारकीर्द पुन्हा स्थापित करण्यामध्ये त्यांना स्वारस्य आहे. सीएसआयआरमध्ये होत असलेल्या परिवर्तनांशी सुसंगत राहून, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री यांनी ‘सीएसआयआर, भारताचे नवोन्मेषाचे इंजिन’ हे नवे घोषवाक्य देखील जारी केले.

जनसंपर्क कक्ष
19 DEC 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : गार्डन्स क्लबतर्फे आयोजित पुष्पप्रदर्शनावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेतेपद शिवाजी विद्यापीठाने पटकावले. यावेळी पारितोषिक देताना शोभा तावडे, सुनीता थोरात. सोबत गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत.

# शिवाजी विद्यापीठ सर्वसाधारण विजेते

## गार्डन्स क्लबचे पुष्प प्रदर्शन; निसर्गप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : रंगीबेरंगी फुलांनी सजलेल्या महावीर गार्डनमध्ये आयोजित दोन दिवसीय पुष्पप्रदर्शनाला निसर्गप्रेमींचा उदंड प्रतिसाद मिळाला. आज विविध स्पर्धातील पारितोषिक वितरण समारंभाने पुष्पप्रदर्शनाचा समारोप झाला.

जीएसटी आयुक्त सुनीता थोरात व आर. एल. तावडे फाऊंडेशनच्या शोभा तावडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. गार्डन्स क्लबतर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे सर्वसाधारण विजेतेपद शिवाजी विद्यापीठाने पटकावले. त्यासोबत गार्डन्स क्लबच्या 'रोजेट' नियतकालिक व वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशनही केले.

दरम्यान, रविवारी (ता. १८) सकाळी चित्रकला स्पर्धा झाल्या. यामध्ये बालकांसह ज्येष्ठांनीही सहभाग घेतला. गुलाब आणि विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने व पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोन्साय, मुक्त रचना, लँडस्केपिंग तर विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, फुलबाग, फुले व बुके या विषयावर आधारित स्पर्धा घेतल्या. यावेळी क्लबचे अध्यक्षा कल्पना सावंत, उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, डॉ. अल्पना चौगुले, जयश्री कजारीया, शैला निकम, संगीता कोकितकर, रविंद्र साळुंखे, राज अथणे उपस्थित होते.

तरुण भारत

# दिगवडेच्या विष्णू वजार्डेंना 'यशदा'कडून निमंत्रण

कोलोली
वार्ताहर

पन्हाळा तालुक्यातील दिगवडेचा तरुण विष्णू वजार्डे यांना यशदाकडून क्लास वन आणि क्लास टूच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी निमंत्रीत केले आहे. 'यशदा' अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, ही महाराष्ट्र शासनाची प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आहे. शासनाच्या विविध विभागांबरोबरच इतर अनेक अशासकीय विभागांमध्ये देखील आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचं काम यशदा करत असते. अशाच प्रकारचे प्रशिक्षण जानेवारी व फेब्रुवारी महिन्यामध्ये यशदा, पुणे येथे आयोजित केले आहे. सदरच्या प्रशिक्षणामध्ये विविध सरकारी विभागांमधील वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकारी प्रशिक्षणार्थी म्हणून असणार आहेत. तर प्रशिक्षक म्हणून कोल्हापूरचे विष्णू नामदेव वजार्डे यांना निमंत्रित करण्यात आले आहे.



यासंदर्भातील 'समाज माध्यमं आणि शासन" असे प्रशिक्षण, २ ते ४ जानेवारी व ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या दरम्यान घेण्यात येणार आहे. याच प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून कोल्हापूरचे तरुण विष्णू नामदेव वजार्डे यांना आमंत्रित केले आहे. हा आपल्यासाठी सर्वात मोठा सन्मान असल्याचे विष्णू यांनी सांगितले. विष्णू वजार्डे हे २०१४ पासून ते आजवर गेली ८ वर्ष समाजमाध्यमांमध्ये काम करत आहेत. आपल्या पदवीत्तर शिक्षणानंतर, शिवाजी विद्यापीठातून वेब डिझाईनचा" अभ्यासक्रम देखील त्यांनी पूर्ण केला आहे.

तरुण भारत

# दूधसाखरमध्ये ग्रामीण पत्रकारिता, जनसंवाद अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
सरवडे

हल्लीच्या स्पर्धेच्या युगात पत्रकारिता हा करिअरसाठी उत्तम पर्याय आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी गांभीर्याने विचार करुन ग्रामीण पत्रकारिता अभ्यासक्रम अभ्यासावा. यातून त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला आकार द्यावा, असे मत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी होडगे यांनी व्यक्त केले.

बिद्री ( ता. कागल ) येथील दूधसाखर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ मान्यताप्रास आणि मराठी विभाग आयोजित ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद या अभ्यासक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक भैरवनाथ डवरी यांनी उपस्थितांना साहित्य आणि पत्रकारिता यांचा जवळचा संबंध याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला डॉ.एस ए. साळोखे, डॉ.एन. डी.पाटील, डॉ. सी. वाय.जाधव, डॉ.एल.एस. करपे, प्रा. ए. बी. माने, प्रा. सुहानी पाटील, एस.के. पाटील, उपस्थित होते. स्वागत समन्वयक प्रा. डॉ. प्रदीप कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्राची चौगले हिने तर आभार शिवानी पाटील यांनी मानले.